"कृपया प्रसिध्दी करिता

माहिती व जनसंपर्क कार्यालय
पुणे महानगरपालिका
१५/१०/२०२६

पुणे महानगरपालिका
वृक्ष प्राधिकरण
प्रेस नोट

## विजयादशमी (दसरा )सणानिमित्ताने वृक्षांच्या फांद्या तोडण्यास प्रतिबंधाबाबत जाहीर आवाहन

पुणे महानगरपालिका अधिकार क्षेत्रास महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे जतन अधिनियम १९७५ चा कायदा लागू करण्यात आला आहे महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे संरक्षण व जतन अधिनियम १९७५, महाराष्ट्र (नागरी क्षेत्रे ) वृक्ष संरक्षण व संवर्धन नियम २००९ व मे.उच्च न्यायालय, मुंबई यांचे दिनांक २० सप्टेंबर २०१३ रोजीच्या आदेशान्वये वृक्ष प्राधिकरणाचे कामकाज करण्यात येते.

महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे संरक्षण व जतन (सुधारणा ) अधिनियम २०२१ या कायद्यानुसार विनापरवाना झाडे जाळणे, तोडणे, किंवा कोणत्याही प्रकारे झाडास हानी पोहचविणे असे कोणतेही कृत्य करणे हा गुन्हा आहे. अशा गुन्ह्यास " शासनाद्वारे अधिसूचित करण्यात येईल अशा पद्धतीचा वापर करून, काढलेल्या मुल्याइतके परंतु, १ लाख रुपयापेक्षा अधिक नसेल इतक्या रक्कमेच्या दंडाची शिक्षा आहे."

तथापि शहरातील सर्व नागरिकांना जाहीर आवाहन करण्यात येते कि, विजयादशमी (दसरा) सणानिमित्ताने आंबा, आपटा, कांचन, शमी इत्यादी तसेच इतर कोणत्याही वृक्षांची तोड करू नये किंवावृक्षास इजा पोहचू नये असे पुणे महानगरपालिकेच्या वृक्ष प्राधिकरणा मार्फत सर्व नागरिकांना आवाहन करण्यात येत आहे. परंपरेचे पालन करताना वृक्षांचे संरक्षण करणे हि प्रत्येक नागरिकाची जबाबदारी आहे.शक्यतो वृक्षास हानी न पोहचवता उपलब्ध पर्यायी प्रतिकात्मक साहित्याचा वापर करावा.

कोणतीही व्यक्तीकडून विना परवाना वृक्षतोड, फांद्या तोडणे अथवा वृक्षांना हानी पोहचविण्याचा प्रकार आढळल्यास संबधित क्षेत्रीय कार्यालयाचे मा. महापालिका सहाय्यक आयुक्त तथा वृक्ष अधिकारी तसेच वृक्ष प्राधिकरण कार्यालय, पुणे महानगरपालिका, यांचेकडे तक्रार करावी.नागरिकांनी आपल्या सूचना /तक्रारी करणेसाठी पीएमसी केअर नंबर९१४६३८३३८३ किंवा टोल फ्री क्रमांक -१८००१०३०२२२, व्हॉटस अॅप तक्रार क्रमांक९६८९९००००२ चॅट बॉट क्रमांक८८८८२५१००१पुणे महानगरपालिकेच्या www.complaints.pmc.gov.in या संकेत स्थळावर ऑनलाईन तक्रार देखील करता येईल.

(डॉ.अशोक दि.घोरपडे)
सह महापालिका आयुक्त तथा
सदस्य सचिव, वृक्ष प्राधिकरण विभाग
पुणे महानगरपालिका